| | | | |
|---|---|---|---|
| MHKO100004922019 | दाखल तारीख | :- | १०/०६/२०१९ |
| | नोंदणी तारीख | :- | १२/०६/२०१९ |
| | निकाल तारीख | :- | ०४/०४/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस<br>०६. ०९. २५. |

**गडहिंग्लज येथील सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**
**गडहिंग्लज, जिल्हा. कोल्हापूर.**
**( पिठासीन अधिकारी : एस. डी. मेहता )**

नियमीत दिवाणी दावा क्र. १०५/२०१९.                निशाणी क्र. ५५/अ.
CNR NO. MHKO100004922019.

१. आप्पया उर्फ आप्पासो बाळाप्पा बागी **(मयत वारस)**

१अ. रुक्मिणी आप्पया उर्फ आप्पासो बागी,
व.व. ६९, व्यवसाय- घरकाम,

१ब. बाळू आप्पया उर्फ आप्पासो बागी,
व.व. ४३, व्यवसाय- शेती,

१क. सुरेश आप्पया उर्फ आप्पासो बागी,
व.व. ३७, व्यवसाय- शेती,
क्र.१अ ते १क रा. मेटाचा मार्ग,
बडयाचीवाडी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर,

१ड. शोभा आप्पासाहेब यडवान्नावर,
व.व. ४५, व्यवसाय- घरकाम,
रा. मुगोलकोड, ता. रायबाग, जि. बेळगांव,

१इ. सुरेखा दिनकर माळी,
व.व. ३९, व्यवसाय- घरकाम,
रा. इस्पुर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर,

२. शिवाजी बाळाप्पा बागी,
व.व. ६१, व्यवसाय- शेती,
रा. मार्केट यार्डच्या पाठीमागे,
गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर,

३. जयश्री बाप बाळाप्पा बागी,
व.व. ६४, व्यवसाय- व्यापार,
रा. मेटाचा मार्ग, बडयाचीवाडी,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

} **वादी**

**//विरुध्द//**

१. आण्णाप्पा दुंडाप्पा बागी,
व.व. ६२, व्यवसाय- शेती,

२. कमल आण्णाप्पा बागी,
व.व. ५१, व्यवसाय- घरकाम,

३. राजू दुंडाप्पा बागी,
व.व. ५७, व्यवसाय- शेती,

४. महादेवी राजू बागी,
व.व. ५३, व्यवसाय- शेती,

५. अशोक दुंडाप्पा बागी,
व.व. ४६, व्यवसाय- शेती,

६. सावित्री अशोक बागी,
व.व. ३५, व्यवसाय- घरकाम,

७. मिनाक्षी दुंडाप्पा बागी,
लग्नानंतरचे नांव- मिनाक्षी सदाशिव नेवडे,
व.व. ५४, व्यवसाय- शेती व घरकाम,

८. इंदूबाई भ्र. शिवाजी बंदी,
व.व. ५४, व्यवसाय- घरकाम,

९. रत्नाबाई दुंडाप्पा बागी,
व.व. ८४, व्यवसाय- घरकाम,
क्र.१ ते ९ रा. मार्केट यार्डच्या पाठीमागे,
गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर,

१०. सदाशिव कल्लाप्पा नेवडे,
व.व. ५४, व्यवसाय- नोकरी,
रा. सोलापूर, ता. हुक्केरी,
जि. बेळगांवी (कर्नाटक).
**(नि. ४९ वरील अर्जाच्या आदेशानुसार दाव्यातून कमी करण्यात आले)**

**प्रतिवादी**

.............................................................................................

**उपस्थिती-**

वादींतर्फे विधीज्ञ - श्री. एम. व्ही. पाटील.
प्रतिवादी क्र.१ ते ९ तर्फे विधीज्ञ - श्री. एस. एन. फगरे.

.............................................................................................

## न्यायनिर्णय

(निकाल तारीख ०४/०४/२०२६)

प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे.

**वादींचे दाव्यातील थोडक्यात कथने खालीलप्रमाणेः-**

०१. दावा मिळकतीचे वर्णन प्रस्तुत दाव्यातील परिशिष्ट क्रमांक १ मध्ये विविक्षितपणे दिलेले आहे. म्हणून त्याचे पुन्हा वर्णन इथे करत नाही. प्रस्तुत दाव्यात वादी व प्रतिवादीचे पुर्वहक्कदार आप्पय्या बागी हे होते. त्यांना दुंड्डप्पा व बाळप्पा असे दोन मुलगे होते. बाळप्पा हे दिनांक १९/०६/१९७५ साली मयत झाले आणि त्यांची पत्नी सिद्धव्वा देखील मयत आहे. त्यांचे मुले वादी हे असुन मुली लग्गव्वा, सुशिला, अण्णव्वा व जयश्री असुन जयश्री व्यतिरिक्त सर्व मुली मयत आहेत. दुंडप्पा हे वर्ष १९९० मध्ये मयत झाले. त्यांना लक्ष्मी आणि रत्नाबाई अशा दोन पत्नी होत्या. त्यापैकी पहिली पत्नी लक्ष्मीबाई ही मयत असून दुंडप्पा व रत्नाबाई यांना प्रतिवादी १ ते ५ हे वारस आहेत.

०२. दावा मिळकती व अन्य मिळकत करीता वादीने वाटप करीता रेग्युलर कज्ञा नं. ३९/२०१५ प्रतिवादी क्रमांक १, ३, ५, ७ ते ९ यांचे विरूद्ध दिवाणी न्यायालय क.स्तर, गडहिंग्लज येथे दाखल केला होता. त्या दाव्यात प्रतिवादींनी कैफीयत देवून हरकत घेतली होती. नंतर त्यांचे मध्ये आपआपसात तडजोड झाली. त्या तडजोडीत प्रस्तुत दाव्याची दावा मिळकती वादी यांच्या हिश्यात देण्यात आली व त्या मिळकतींचा कब्जा देखील वादी यांना दिनांक ०९/१२/२०१७ पूर्वी देण्यात आला व त्याप्रमाणे रेग्युलर कज्ञा नं. ३९/२०१५ च्या दाव्यात दिनांक ०९/१२/२०१७ रोजी आपसात पुरशिस देवून आपसात हूकुमनामा करण्यात आला आहे.

०३. वरील रेग्युलर कज्ञा नं. ३९/२०१५ च्या दाव्यात जी आपसात पुरशिस दिली होती त्या पुरशिस मधील कलम ३ मध्ये “रिव्हीजन सर्वे नं. ६४५, ६४६, ७५६ या मिळकतीची जिल्हा उपनिरीक्षक, भुमिअभिलेख गडहिंग्लज यांच्या मार्फत एकमेकांच्या संमतीने रितसर मोजणी रक्कम समान हिश्याने करून वादी व

प्रतिवादी यांनी एकमेकांच्या संमतीने वर नमुद ३ मिळकतीचे ज्यांचे त्यांचे कब्जे व हिश्याप्रमाणे मोजणी करून घेवून मोजणी अंती ज्यांच्या त्यांच्या हिश्यास आलेले क्षेत्र वहिवाट मालकी नात्याने मोजणी नंतर स्वतंत्र कब्जे वहिवाट करणेची आहे व वादी व प्रतिवादींनी भविष्यात एकमेकांच्या हिश्याच्या हद्दी बिघडविण्याच्या नाहीत व ही गोष्ट यांतील वादी व प्रतिवादी यांना मान्य कबुल आहे". अशा प्रकारची कथने कथन करून सदरचा दावा आपसात पुरशिसने निकाली काढण्यात आला होता.

०४. वरील रेग्युलर कज्ञा नं.३९/२०१५ तडजोडीने निकाली निघाल्यानंतर वादी व प्रतिवादीने ज्यांच्या त्यांच्या मिळकती खाजगी मोजणीदाराकडून मोजणी करून घेवून ताब्यात घेतलेल्या होत्या व आहेत. अशा परिस्थित वादी व प्रतिवादी क्र. १, ३, ५, ७ ते ९ यांच्या दरम्यान झालेल्या तडजोड हूकुमनाम्यानुसार त्या दाव्यातील शेतजमिनी मिळकतींच्या सातबारा पत्रकी नोंद होण्याकरीता त्यांनी तहसीलदार, गडहिंग्लज यांचेकडे अर्ज सादर केला होता. परंतु, तहसीलदाराने आपसात हुकूमनामा नोंदणीकृत करून घेतल्या खेरीज त्याचा सातबारा पत्रकी अंमल करता येणार नाही हे कारण देवून अर्ज नामंजूर केला. त्या आदेशाच्या विरूद्ध वादीने रेग्युलर कज्ञा नं. ३९/२०१५ च्या दाव्यात नमूद दावा मिळकतींच्या सातबारा पत्रकी महसूल अधिकारी यांनी फेरफार मंजूर करून वादी व त्या दाव्यातील प्रतिवादी यांच्या नावाची नोंद करावी म्हणून तहसीलदारांविरूद्ध दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांच्याकडे दावा दाखल केला असून तो आजरोजी प्रलंबीत आहे.

०५. वादी यांना रेग्युलर कज्ञा नं. ३९/२०१५ मधील आपसात हूकुमनामा अन्वये मालकी नात्याने कब्जे वहिवाटीस आली असताना यातील वादी यांच्या नावाची नोंद त्या मिळकतींच्या सातबारा पत्रकी रेग्युलर कज्ञा नं. ३९/२०१५ मधील आपसात हुकूनाम्याप्रमाणे झाले नसलेच्या गैरफायदा घेवून यातील प्रतिवादी हे एकमेकांशी संगणमत करून यातील प्रतिवादी हे वादींच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहीवाटीस हरकत व अडथळा करू लागले. तसेच, पेरणीपूर्वी मशागतीची कामे करण्यात प्रतिबंद करू लागले. म्हणून यातील वादींनी प्रतिवादींना तसे न करण्याबाबत विनंती केली असता यातील प्रतिवादी यांनी वादी यांना

मारहाण व शिवीगाळ केली म्हणून यातील वादी यांनी प्रतिवादींविरूद्ध पोलीस ठाणे गडहिंग्लज येथे गुन्हा नोंद केलेला आहे. तरीसुद्धा प्रतिवादी यांनी हरकतीचे कृत्य तसेच चालू ठेवलेले आहे. प्रतिवादींची सदरची बेकायदेशीर कृत्येही कोर्टाच्या योग्य त्या मनाई हुकूम शिवाय थांबणार नाही याची वादींना खात्री झाली आहे. मे २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात दावा मिळकतीमध्ये वादी पेरणीपूर्वी मशागतीची कामे करीत असताना प्रतिवादिंनी वादींच्या शांततामय मालकी कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा निर्माण केला म्हणून, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूद्ध कायम मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे.

०६. दाव्याकामी समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादींनी हजर होवून नि.२५ कडे आपली कैफियत दाखल केली आणि दाव्यातील संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. त्यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये कथन केले की, वादींनी प्रस्तुत दावा मिळकतीच्या चर्तुसीमा जाणीवपुर्वक नोंद केलेल्या नाहीत. दावा मिळकतीपैकी अनुक्रमे ५ ते ७ या आजतागायत सोईनुसार वादी व प्रतिवादी कसत असून सर्वांचे सामाईकात कब्जे वहिवाट असल्याने रेग्युलर कज्ञा नं.३९/२०१५ चे दाव्यातील हुकूमनाम्याप्रमाणे अनुक्रमे १ ते ४ या दावा मिळकती वादी क्र.१ ते ३ यांना सामाईकात पुर्ण मालकी हक्काने त्यांच्या पूर्वीचा कब्जा कायम करून दिलेला असून त्या मिळकतीमध्ये प्रतिवादींनी आपला हक्क सोडून दिलेला आहे. वादीच्या दाव्यास दिवाणी प्रकिया संहिता आदेश ७, नियम ३ ची बाधा येत असून दावा रद्द होण्यास पात्र आहे.

०७. प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये मान्य केले की, वादीने रेग्युलर कज्ञा क्र.३९/२०१५ चा दावा प्रतिवादींविरूद्ध वाटप करीता दाखल केला होता. त्या दाव्यात प्रतिवादी क्र.१, ३, ५, ७ ते ९ यांच्या दरम्यान मध्यस्थीने आपसात दिनांक ०९/१२/२०१७ रोजी लोकअदालत मध्ये तडजोडीने हुकूमनामा होवून वाद संपुष्टात आणला होता. प्रस्तुत दाव्यातील अनुक्रमे १ ते ४ च्या संपूर्ण मिळकती पुर्णपणे वादींच्या मालकी हक्कात देवून पूर्वीचाच वादींचा कब्जा कायम करून हुकूमनाम्याप्रमाणे वादींना देण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादींना रिव्हीजन सर्वे नं. ५७२/७, ५७२/८, ५७२/१२ च्या संपूर्ण शेतजमीन मिळकतीच्या

मालकी हक्काने पूर्वीच्या कब्जा कायम करण्यात आलेला आहे.

०८. रेगुलर कज्ञा क्र. ३९/२०१५ च्या दाव्यातील आपसात तडजोड पुरशिस प्रमाणे कलम ३ प्रमाणे नमुद केले विश्लेषनाचे कथन केलेले वर्णन सर्वसाधारणप्रमाणे हुकूमनाम्यानुसार मजकूर नमुद केला असून तो बरोबर आहे. परंतु, वादीने हुकूमनाम्यातील अटींनुसार पुढील कार्यवाही केलेली नाही. वादीने परस्पर प्रतिवादींना न सांगता खाजगी मोजणी करून दावा मिळकत मधील सामाईक हिश्यातील शेतजमीनी लबाडण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. रेगुलर कज्ञा नं.३९/२०१५ च्या कामी तारीख ०९/१२/२०१७ रोजी झालेल्या हुकूमनाम्यातील अट क्र. ३ व ४ नुसार रिव्हीजन सर्वे नं. ६४५, ६४६ व ७५६ या मिळकतीची वादी व प्रतिवादी यांनी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांच्याकडे एकमेकांच्या संमतीनुसार मोजणी रक्कम समान हिश्याने भरून उपरोक्त तिन्ही मिळकतींचे ज्यांचे त्यांचे हिस्से हुकूमनाम्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे क्षेत्राची मोजणी करून मोजणीअंती ज्यांचे त्यांचे क्षेत्र निश्चित करून स्वतंत्र कब्जे वहीवाट हद्द निश्चितीनंतर मोजणीप्रमाणे करण्याच्या अटींची पूर्वता वादी न करताच प्रतिवादीचे मालकीचे जादाचे क्षेत्र लुबाडण्याच्या हेतून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. म्हणून, दावा खारीज करण्याची विनंती केली.

०९. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. माझे पूर्वाधिका-याने दाव्यातील कथनांच्या व प्रतिकथनांच्या अनुषंगाने निशाणी क्र.२६ अन्वये खालील मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी अनुमान काढून कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | वादी सिद्ध करतो का की, प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये शांततामय कज्ञे वहीवाटीस हरकत व अडथळा केला? | होय |
| **०२.** | वादी हे प्रतिवादींच्या विरुध्द निरंतरची ताकीद मिळणेस पात्र आहेत का ? | होय |
| **०३.** | प्रतिवादी हे रक्कम रु.१,००,०००/- विशेष नुकसार भरपाई मिळणेस पात्र आहेत का ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| **०४.** | आदेश व हुकूमनामा काय ? | दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

१०. वादी यांनी त्यांचे कथन शाबीत करणेकामी साक्षीदार क्र.१ म्हणून स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२८ वर दाखल केले आहे. वादी यांनी त्यांचे कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | गट क्र.५७२/१ चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३३ |
| २. | गट क्र.५७२/३ चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३४ |
| ३. | गट क्र.५७२/४ चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३५ |
| ४. | गट क्र.५७२/१० चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३६ |
| ५. | गट क्र.६४५ चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३७ |
| ६. | गट क्र.६४६ चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३८ |
| ७. | गट क्र.७५६ चा सन २०१७-१८ सालचा ७/१२ उतारा. | ३९ |
| ८. | दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गडहिंग्लज रेगुलर कज्ञा नं. ३९/२०१५ च्या कामी झालेल्या आपसातील हुकूमनाम्याची सही शिक्याची नक्कल | ५० |
| ९. | प्रतिवादीस मोजणीसाठी पाठविलेली नोटीस | ५१ |

वादीने निशाणी क्र.४२ कडे पुरसीस देऊन पुरावा बंद केला.

११. प्रतिवादीने स्वतःच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ४४ वर दाखल केला असून कागदोपत्री पुरावा निशाणी क्र.५४ सोबतच्या यादीसोबत दाखल केला. प्रतिवादीने आपला पुरावा निशाणी क्र. ४८ कडे पुरशिस देवून बंद केला.

**मुद्दा क्र.१ ते ४ करिताः-**

१२. प्रस्तुतचा दावा शाबित करण्यासाठी वादीने निशाणी क्र. ४२ वर आपल्या पुराव्याचे शपथपत्र दिलेले आहे. त्यातील कथन दाव्यातील कथनानुसार तंतोतंत नमूद आहे. वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत वडीलोपार्जित होती त्याकरीता प्रस्तुत दावा देण्यापूर्वी त्यांनी प्रतिवादी क्र. १, ३, ५, ७ ते ९ विरूद्ध

रेग्युलर कज्ञा क्र. ३९ /२०१५ दावा मिळकत व अन्य मिळकती मध्ये वाटप करिता दाखल केला होता. त्या दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक ०९/१२/२०१७ रोजी तडजोड होवून हुकूमनामा निशाणी क्र. ५० पारीत करण्यात आला. त्यानुसार प्रस्तुत दाव्यातील अनुक्रमे १ ते ४ मधील मिळकत वादी यांना वाटपमध्ये मालकी कब्जात देण्यात आली आणि प्रस्तुत दाव्यातील मिळकत क्र. ५ ते ७ मधील वाटप वरील रेगुलर कज्ञा क्र. ३९/२०१५ च्या कलम ३ व ४ नुसार करण्यात येवून त्याचा मालकी कब्जा वहीवाट वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये अटी-शर्तीनुसार करण्यात आला. प्रस्तुत दाव्यात वादी प्रतिवादीमध्ये दावा मिळकत क्र. १ ते ४ च्या बाबतीत कोणताही वाद नाही. प्रस्तुत दाव्यात केवळ दावा मिळकत क्र. ५ ते ७ च्या वाटप करीता रेग्युलर कज्ञा क्र. ३९/२०१५ च्या अटींनुसार मोजणी करून वाटपात नमुद केलेला मालकी कब्जा वहीवाट भुमी अभिलेख कार्यालयामार्फत झालेली नाही. म्हणून, त्याचा वाद वादी व प्रतिवादीमध्ये निर्माण झालेला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी दावा मिळकत क्र. ५ ते ७ मधील तडजोड हुकूमनाम्यानुसार वादीच्या मालकी कब्जा वहीवाटीस सातबारा सदरी स्वतंत्र नावाची नोंद नसल्याचा गैरफायदा घेवून वादीच्या वरील मिळकतीवर शांततामय मालकी कब्जा वहीवाटीस अडथळा निर्माण करीत आहेत व त्यांना हूसकावून लावण्याच्या प्रयत्नात आहेत. सबब, प्रस्तुतचा दावा त्यांच्याविरूद्ध कायम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीच्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, दावा मिळकत वडीलोपार्जित मिळकत आहेत आणि पुर्वीचा दावा क्र. ३९/२०१५ मध्ये नमूद दावा मिळकती सामाईक वहिवाटीची असून त्यांच्या हद्दी निश्चित करून तसे वाटप होवून मिळकती तुटक करणेबाबात दावा दाखल केला होता. त्यांनी मान्य केले की, सदर मिळकतीचे आजपर्यंत सरकारी मोजणी होवून हद्दी निश्चित करून त्या मिळकणी तुटक झालेल्या नाहीत. त्यांनी मान्य केले की, पुर्वीच्या दाव्यामध्ये झालेल्या तडजोडीनुसार सरकारी मोजणी करून हद्दी निश्चित करून मिळकती तुटक करणेबाबत ठरले होते. त्यानुसार जमिनीच्या हद्दी निश्चित होवून त्या तुटक होवून त्याचा सात-बारा वेगळा होवून तसा नकाशा तयार करण्याकरीता त्यांनी मोजणी कार्यालयाकडे अर्ज दिलेला आहे. त्यांनी मान्य केले की, दिवाणी दावा क्र. ३९/२०१५ मधील हुकूमनाम्याचा

आजतागायत अंमल झालेला नाही. त्यांनी मान्य केले की, सदर मोजणीकरीता लागणारे पैसे त्यांनी भरलेले नाहीत. त्यांचे आणि प्रतिवादीचे दावा मिळकतीमधुन उत्पन्न घेणे वेगवेगळे आहे. त्यांनी मान्य केले की, तडजोडीप्रमाणे जोपर्यंत जमिन तुटक होत नाही तोपर्यंत सर्वांनी त्यांची आहे तशीच वहीवाट ठेवायची ठरले होते. याव्यतिरीक्त इतर सुचक प्रश्नांना वादीने नाकारले.

१३. प्रतिवादीने त्याची बाजू शाबित करण्यासाठी स्वतःच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ४४ वर दाखल केला. त्यानेपण त्यातील कथने कैफियतीनुसार तंतोतंत मांडले. त्याच्या म्हणण्यानुसार वादीने रेगुलर कज्ञा क्र. ३९/२०१५ च्या तडजोड पुरशिस च्या अटी-शर्तींच्या पुर्तता केलेल्या नाहीत. उलट प्रतिवादी च्या दावा मिळकत ५ ते ७ मधील शेतजमीन वर मालकी कज्ञा वहीवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत आहेत. उलटतपासात त्याने मान्य केले की, पुर्वी दाखल केलेला दावा क्र. ३९/२०१५ मध्ये लोकअदालतमध्ये तडजोड होवून तो दावा निकाली निघाला. वादी आणि प्रतिवादी क्र. १, ३, ५, ७ ते ९ मध्ये त्या दाव्यात तडजोड झाली होती व त्या तडजोडीत गड क्र. ६४५ मधील पुर्वेकडील जमीन वादी यांच्याकडे आणि पश्चिमेकडील जमीन प्रतिवादी यांच्याकडे आहे. तसेच त्यांची मान्य केले की, गट क्र. ६४६ मधील पुर्वेकडील जमीन जमीन वादी यांच्याकडे व पश्चिमेकडील जमीन प्रतिवादी यांच्याकडे आहे. गट क्र. ७५६ ही रूद्रगोंडा पाटील यांच्या मालकीची आहे हे मान्य केले. त्याने मान्य केले वरील गटांची एकत्रित मोजणी करण्यासाठी त्याने अर्ज दिला नव्हता. त्याने मान्य केले पुर्वीच्या दाव्याच्या हुकूमनाम्याच्या संदर्भात तहशील कार्यालयाकडून त्याला नोटीस मिळाली होती. त्याने सांगितले की, तहशिल कार्यालयाकडून मिळालेल्या नोटीसनुसार प्रतिवादी आणि सहहिस्सेदार हजर झाले होते आणि हजर झाल्यानंतर तहशिल कार्यालयाद्वारे तयार करण्यात आलेला नकाशा त्याला दाखविण्यात आला होता. त्याने सांगितले की, पुर्वीच्या दाव्यात झालेल्या तडजोड हुकूमनाम्यानुसार मोजणी होवून वाटणीपत्र तयार होण्यासाठी शुल्क भरण्यास तो तयार नाही. शेवटी त्याने सांगितले की, पुर्वीच्या दाव्याच्या तडजोड हुकूमनाम्यानुसार तो वागायला तयार आहे.

१४. अभिलेखावर आलेल्या वादी आणि प्रतिवादी यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादींमध्ये प्रस्तुत दाव्यात पुर्वी दावा मिळकत व अन्य मिळकतीकरीता रेग्युलर कज्ञा क्र. ३९/२०१५ वाटप करीता दाखल झाला होता आणि त्यामध्ये त्यांच्यात आपआपसात दिनांक ०९/१२/२०१७ रोजी तडजोड पुरशिसनुसार हुकूमनामा करण्यात आला. त्या हुकूमनाम्यानुसार प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत क्र. १ ते ४ च्या मालकी कब्जा वहीवाट कायमस्वरूपी वादींचा देण्यात आली ही बाब प्रतिवादीने प्रस्तुत दाव्यात मान्य केली आहे. सबब, त्याबाबत उहापोह करण्याची आवश्यक्ता नाही. त्याव्यतिरीक्त प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत क्र. ५ ते ७ बाबत वादी व प्रतिवादीमध्ये वाद आहे. पुर्वीच्या दाव्यात तडजोड पुरशिस नुसार झालेला हुकूमनामा निशाणी क्र. ५० चे अवलोकन केले असता त्याच्या मध्ये वरील मिळकतीचे वाटप वादी व प्रतिवादींमध्ये स्पष्टपणे झाल्याचे नमुद केले आहे. परंतु, त्यामध्ये कलम ३ आणि ४ नुसार अटी-शर्ती ठेवल्या की, वादी व प्रतिवादीमध्ये दावा मिळकत क्र. ५ ते ७ ची तडजोड पुरशिसद्वारे झालेल्या हुकूमनाम्यानुसार वाटणीमध्ये आलेल्या शेतजमिनीची मोजणी उप-अधिक्षक भुमिअभिलेख द्वारे त्यांच्या ताबे कब्जातील कालकीच्या क्षेत्राची मोजणी करून हद्द निश्चित करण्यात येईल. परंतु, त्या अटी-शर्तींची पुर्तता न झाल्यामुळे वरील मिळकतींमधील सामाईक मिळकतीबाबत वाद उपस्थित झाले आहेत.

१५. वादीने त्यांच्या पुराव्यामध्ये शाबित केले आहे की, त्याने पुर्वीच्या दाव्यात झालेल्या तडजोड पुरशिसनुसार दावा मिळकत क्र. ५ ते ७ च्या वाटणी करीता तहशिलदार यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे आणि त्या अर्जावरून तहशिलदार कार्यालयामार्फत निशाणी क्र. ५१ कडे दाखल नोटीस पाठविण्यात आली व त्यानुसार प्रतिवादी व सह हिस्सेदार तिथे हजर झाले व तहशिलदार कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेला नकाशा त्यांना दाखविण्यात आला. वरील प्रश्नांना प्रतिवादींनी मान्य केल्यामुळे वादीने पुर्वी दाखल झालेल्या रेग्युलर कज्ञा क्र.३९/२०१५ च्या हुकूमनाम्यानुसार त्याच्या मालकी कब्जा वहीवाटीस आलेल्या वरील मिळकतीची वाटणी करीता त्यांनी पुढाकार घेतला आहे हे शाबित होत आहे. उलट प्रतिवादीने स्पष्ट मान्य केले की, पुर्वीच्या दाव्यात झालेल्या

तडजोड हुकूमनाम्यानुसार मोजणी होवून वाटणीपत्र तयार होण्यासाठी शुल्क भरण्यास तो तयार नाही. यावरून वादीने शाबित केले आहे की, पुर्वीच्या दाव्यात तडजोड हुकूमनाम्यानुसार त्याला दावा मिळकत क्र. ५ ते ७ मालकी कब्जा मिळालेला आहे. त्याची वाटणी करण्यासाठी वादी तयार होता आणि आहे. परंतु, प्रतिवादी विनाकारण दाव्यामिळकतीमधील वादीच्या मालकी कब्जा वहिवाटीस आलेल्या क्षेत्रास हरकत व अडथळा निर्माण करून हुसकावण्याचा प्रयत्न करीत आहे. सबब, वादी यास त्यांच्या मालकी कब्जे वहिवाट मधील मिळकतीस शांततामय उपभोग घेण्याकरीता प्रतिवादींविरूद्ध कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळण्यास तो पात्र आहे. वादीने प्रतिवादी त्याच्या तडजोड हुकूमनामा निशाणी क्र. ५० नुसार वादीच्या मालकी कब्जा वहीवाटीस प्रतिवादी हरकत व अडथळा निर्माण करून हुसकावण्याचा प्रयत्न करीत आहे ही बाब तोंडी आणि कागदोपत्री पुराव्यांद्वारे शाबित केलेली आहे. सबब, वादी प्रतिवादींविरूद्ध कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे. याउलट प्रतिवादीने मागणी केलेली नुकसान भरपाईची रक्कम वादीकडून मिळण्यास पात्र नाही. उलट प्रतिवादीने विनाकारण वादी यास त्रास दिल्यामुळे वादी प्रतिवादीकडून दाव्याचा खर्च मिळण्यास पात्र आहे. वरील कारणांवरून मुद्दा क्र. १ आणि २ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२] प्रतिवादी यांनी अगर तर्फे इसम यांनी वादीच्या प्रस्तुत दाव्यातील परिशिष्ट १ मध्ये नमूद दावा मिळकतीत असलेल्या शांततामय मालकी कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अगर अडथळा करू नये. तसेच, दावा मिळकतीमधून वादींना हुसकावून लावू नये. असा निरंतर मनाई हुकुमाचा आदेश त्यांचेविरुध्द देण्यात येतो.

३] येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.04.04 23:32:12 +0530

दिनांकः ०४/०४/२०२६.
गडहिंग्लज.

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज, जिल्हा-कोल्हापूर.